SAT-9 FEB PRAJAWANI - Marathi

# युवापिढीवर मानवी मूल्यांची रुजवणूक करणारा 'जिवोत्सव २०१३' संपन्न

नांदेड,दि.८:- श्री सत्यसाई सेवा समिती नांदेड वतीने व शारदाभवन शिक्षण संस्थेच्या सहकार्याने नांदेडमध्ये 'कुसुम' सभागृहात २ ते ३ फेब्रुवारी २०१३ रोजी जिवोत्सव २०१३ चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री डी.पी.सावंत यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी व्यासपीठावर खा. भास्करराव पाटील खतगांवकर, सौ. स्नेहलताताई पाटील खतगांवकर, शारदा भवन शिक्षण संस्थेचे सचिव उदयराव निंबाळकर यांची उपस्थिती होती. तसेच दिवसभर झालेल्या कार्यक्रमात शारदा भवन शिक्षण संस्थेतील नऊ महाविद्यालयातील जवळपास १००० च्या वर युवा युवतींनी उपस्थिती नोंदविली. नऊ महाविद्यालयातूनच मानवी मुल्यांवर आधारीत ' मानवी मूल्य आणि सामाजिक जागरूकता' या संवेदनशील विषयावर नाटीका सादर करण्यात आल्या. याशिवाय विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यासाठी सत्यसाई अखिल भारतीय सेवा संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. निमिष पंडया, गोपालराव , रमेश सावंत यांना आमंत्रित करण्यात आले होते.



समारोपाच्या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांची उपस्थिती होती. आ. वसंतराव चव्हाण, आ. ओमप्रकाश पोकर्णा जि.प. अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर, उपमहापौर आनंद चव्हाण, शारदाभवन शिक्षण संस्थेचे सहसचिव उदयराव निंबाळकर, यांचीही उपस्थिती होती. यावेळी प्रथम द्वितीय बक्षिस पात्र ठरलेल्या नाटक कलाकार विद्यार्थ्यांचे अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते स्मृति चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. व यापुढेही मानवी मूल्यांची जोपासना करण्यासाठी कॉलेजमध्ये ' जिवा क्लबची' स्थापना करण्यात आली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शारदा भवन शिक्षण संस्थेचे सहसचिव उदयरावजी निंबाळकर , श्री सत्यसाई सेवा समितीचे अध्यक्ष राऊतखेडकर, महिला संघटनेच्या अध्यक्षा सौ. स्नेहलता पाटील खतगांवकर समितीचे कन्वेनर सुरेश काळे, दशरथ सिंह परदेशी, शंकरराव कुंटूरकर, अनिल पत्रे, अरुण सरनाईक, विजय काकडे, भांडवले, नितीन काकडे, डॉ. नरेश रायेवार, रावसाहेब उपासे , सौ. माधुरी काळे, विद्या काकडे इ. साईभक्तांच्या परिश्रमातून हा कार्यक्रम संपन्न झाला.